# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५ अक्टोबर, अंक क्र. ३

# बिनती सुनिए

बिनती सुनिए अदिशक्ती मेरी ।
पुजन का अधिकार दिजिए ।
शरणागत है हृदय पुजारी ॥धृ॥

गरू चरणनकी लागी लगन है ।
तव चरणनमें उतरा स्वर्ग है ।
परमेश्वर हे मंगलकारी
खोए सादक को पार उतरिये ॥१॥

प्रित बहे अविरल नयननसे।
हे हृदयेश्वरी भव भय भंजन ।
माँ ऐसी शुभ शक्ति दिजीए ।
सब मे जागे आनंद विहारी ॥२॥

और कहूँ क्या अंतरर्यामी ।
आत्म बोध अनुभूतिकी दात्री ।
अदिगुरू गुरूओंकी माता ।
इस विनिलको गुरूपद दिजीए ॥३॥

*- श्री माताजी निर्मलादेवी*

# सहस्त्रार दिवस पूजा परम पूज्य श्री. माताजींच्या
## भाषणाचा अनुवाद. ५ मे १९८४ (फ्रान्स)

एका नवीन युगाची सुरुवात

तुम्ही इतक्या मोठ्या संख्येने जमलेल्या तुम्हा सुंदर सहजयोग्यांना पाहून तुमच्या आईला पुष्कळच आनंद होत आहे. मला वाटते सहजयोगाचे पहिले युग संपून आता नवीन युगाची सुरुवात झाली आहे. , सहजयोगाच्या पहिल्या युगाची सुरुवात सहस्त्रार उघडल्यापासून झाली होती. हळूहळू पूर्णत्वाकडे जात असताना आज किती तरी महान सहजयोगी दिसतात. आपण सर्व एका स्वाभाविक प्रक्रियेतून मोठे झाले आहात. प्रथम कुंडलिनीची जागृत झाली व टाळूच्या भागाचे छेदन झाले. तुमच्या डोक्यावरुन जशी तुम्ही बंधने घेता तशाच पद्धतीने तुमच्या सहस्त्रारात चक्रे बांधली आहेत, तेव्हा पहिल्या युगात आपण तुमच्या पाठीच्या कण्यातील व मेंदूतील चक्राच्या देवता जागृत केल्या. परंतू आता हे पसरावयाचा समय आला आहे. व हे कसे पसरावयाचे ते आपण समजून घेतले पाहिजे. जसे इंद्रधनुष्याचे सात रंग असतात तसे या चक्राचे सात रंगाचे प्रकाश आहेत.

डोक्याचे मागचे बाजूने सुरुवात केली तर मुलाधार चक्रापासून निघून पुढचे बाजूस आपण आज्ञा चक्रावर येतो. नीट बघीतले तर तुमच्या लक्षात येईल की, सहस्त्रारात ही चक्रे निराळ्या क्रमाने बसविली आहेत. सहस्त्रार अंतर्शील असल्याने आपल्या टाळूचा केंद्रबिंदू हृदयाशी जुळतो. म्हणून दुसऱ्या युगाचा कार्यबिंदू हृदय होतो. मला काय म्हणावयाचे आहे हे मला वाटते, तुमच्या लक्षात आले असेल. म्हणून जर तुम्हाला सहस्त्राराकडे लक्ष द्यायचे असेल तर प्रथम तुम्हाला हृदयाकडे लक्ष द्यावे लागेल. सहस्त्रारामध्ये हृदयचक्र व हृदय म्हणजे आत्मा, एक होतात. म्हणजेच जगदंबा हृदयाशी एकरुप होते. हाच आत्मा आहे तेव्हा आता लक्षात आले असेल, की या ठिकाणी योग घटित होतो. या क्षणी आपण हे समजावून घेणे महत्वाचे आहे की आपल्याला मोठे पाऊल उचलायचे आहे. संपूर्ण सहस्त्रार घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरते. सर्व चक्र त्यांचा प्रकाश अशाच मार्गाने सोडतात. आणि हे सर्व हृदयाच्या भोवती घटित होते म्हणून सर्व धर्माच्या, सर्व अवताराच्या शिकवणुकीचा गाभा आहे करुणा, व त्याचे स्थान हृदयात आहे.

म्हणून दुसऱ्या युगामध्ये आपल्यामध्ये करुणा असणे अत्यंत आवश्यक आहे. हे करुणेचे प्रत्यंतरच आहे. जर परमात्म्याला करुणा नसती तर त्याने इतके मोठे विश्व बनविलेच नसते. खरे म्हणजे परमात्म्याची शक्ति, म्हणजेच आदिशक्ति, ही त्याच्या करुणेची मूर्तिच आहे. त्याच्या करुणेमुळेच मानवाला उत्क्रांत केले आहे. तुम्हाला सहजयोगी बनवून मुक्त करण्याचे कार्य सुद्धा परमात्म्याच्या करुणेतूनच घटित होते आणि करुणा सदैव क्षमेनी झाकलेली असते. तर

तीन विभाग या ठिकाणी एक होतात. परमेश्वराचा मुलगा म्हणजे मूर्तिमंत क्षमा. तर परमात्मा जो साक्षी आहे, आई जी संपूर्णपणे साक्षांत करुणाच आहे व मुलगा जो क्षमास्वरुप आहे, हे तिचे हृदय चक्रात सहस्त्रारांमध्ये भेटतात.

आता, सहस्त्राराची कशी सुधारणा घडवून आणायची ते पहा. सहस्त्राराच्या अधिष्ठात्री देवतेला तुम्ही चांगले जाणता. आता, तुम्ही ते जाणता की, सहस्त्रार तुमच्या डोक्यात आहे. पण ते संपूर्ण विश्वाचा केंद्र बिंदू आहे. त्यांची वृद्धी करण्यासाठी तुम्हाला तुमच्या टाळूच्या मध्यभागी असलेल्या हृदय चक्रामध्ये चित्त ठेवायला पाहिजे. परंतु तुम्हाला या अधिष्ठात्री दैवताला प्रथम हृदयात प्रस्थापित करायला हवे. पण तुम्ही नशीबवान आहात कारण ते दैवत तुमच्या पुढे व्यक्तिच्या रुपात उभे आहे. मी पृथ्वीवर येण्याचे पूर्वी ज्या लोकांना साक्षात्कार झाला, त्यांना दैवताची कल्पना करावी लागे व कल्पना करण्यात ते केव्हाच परिपूर्ण नव्हते. शिवाय असे पण म्हणतात की सहस्त्रारात महामाया आहे, असे वर्णन केले आहे तर तुम्ही जर महामाया असलेल्या व्यक्तिला पहाल तर त्यांना तुम्ही पूर्णतया व परिपूर्णपणे समजू शकणारच नाही. कारण महामाया शक्ति तुमच्या कल्पनेपेक्षाही फार मोठी आहे. म्हणून शरण जाणे आवश्यक आहे. तुमच्या सीमित कल्पना शक्तिने किंवा बुद्धिने तुम्हाला त्या दैवताला जाणून घेणे शक्य नाही. शिवाय तिला भक्तिगम्या असेही म्हटले आहे. म्हणजे त्यांना तुम्ही तुमच्या भक्तिमधूनच समजू शकता. तेव्हा भक्ति असणे आवश्यक आहे. परंतु भक्ति अत्यंत स्वच्छ असली पाहिजे. म्हणजे हृदयात कोणतीही द्वैष भावना असू नये. हृदय स्वच्छ हवे. हृदय स्वच्छ ठेवणे अवघड आहे. मानवाचे सत्याचे ज्ञान नेहमी सापेक्ष असते. परंतू सत्य परिपूर्ण असते. म्हणून सत्याला प्राप्त करुन घेण्यासाठी माणसाला त्याचे हृदयात असलेल्या सर्व अशुद्ध गोष्टीं काढून टाकल्या पाहिजेत. म्हणून प्रथम आपले हृदय जरी स्वच्छ नसले तरी साक्षात्कार प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी आपल्याला पुष्कळ आसक्ति असते. बऱ्याच असत्य गोष्टींबद्दल आपल्याला आत्मीयता असते. शिवाय आपली अशी पण समजूत असते की जागृती किंवा आत्मसाक्षात्कार झाल्यावर आपण फार शक्तिमान होऊ. जागृतीनंतर सुद्धा आपण क्षुद्र गोष्टीमध्ये गुंतून पडू लागलो, आपल्या नातेवाईकांना, आयांना, बहिणींना कृपा करावी असे म्हणू लागलो. स्त्रियांना त्यांच्या नवऱ्यांची, मुलांची, भावांची आठवण झाली ज्यांच्या ज्यांच्यात म्हणून त्या गुंतून पडल्या होत्या त्याच्यासाठी त्या आशिर्वाद मागू लागल्या.

मला माहिती आहे की लवकरच या मायापाशांतून तुम्ही स्वतःची सुटका करुन घेतलीत. अवताराचे कार्य असे आहे की त्यांना त्यांच्या शिष्यांची, भक्तांची इच्छा पूर्ण करायची असते. उदा. गोपींनी श्रीकृष्णाला सांगितले की तू आमच्या प्रत्येकीबरोबर रहायला हवे. म्हणून त्याचे स्वतःची अनेक कृष्णामध्ये विभागणी केली व प्रत्येकी बरोबर तो राहिला. पण गोपींची ती इच्छा अत्यंत पवित्र होती. पण जेव्हा तुम्ही मला तुमच्या भावांबद्दल, बहिणींबद्दल आईबद्दल, वडिलांबद्दल सांगता तेव्हा ते सुद्धा मी जितके जमेल तितके पूर्ण करते. शिवाय तुम्ही आश्रय मागता, क्षेमाची इच्छा करता, जे काही तुम्हाला आवश्यक आहे ते मागता व ते पूर्ण केले जाते. तर श्रीकृष्णांचे पातळीवर "योगक्षेमं वहाम्यहम" चे वचन होते व म्हणून तुमच्या क्षेमाची काळजी वाहून ते वचन पूर्ण केले गेले. पण आता या नवीन युगांत काय घडणार आहे?

आता तुमची कुंटुंबे सुस्थितीत आहे. तुम्हाला आश्रय आहेत, चांगल्या नोकऱ्या आहेत, तेव्हा आता पुढच्या युगाचा विचार करु. जसं मी तुम्हाला सांगितले, पुढचे युग प्रेमाचे आहे. पण, तुमच्यामधील एखादे चक्र जर कमकुवत असेल, जर सात रंगाच्या मिश्रणाने तयार होणारा शुभ्र-प्रकाश जर अधुंक किंवा सदोष असेल तर तुमच्या मधील चक्रांचे संगोपन केले पाहिजे. प्रत्येक चक्राकडे लक्ष देऊन प्रेम किंवा प्रेमभावना तेथे स्थापित करायला हवी. आता श्री

गणेशाचे चक्र घ्या. श्री. गणेशांकडे लक्ष द्या. व तुमचे विचारातून अत्यंत आदराने त्यांना आपल्या मुलाधार चक्रावर प्रस्थापित करा. आता तुमचा विचार दैवी झाला आहे.

लक्षात ठेवा सहजयोगाच्या पहिल्या पर्वात हे सर्व मी तुमच्याशी बोलू शकले नसते. हे अतिशय सूक्ष्म कार्य आहे. आता तुमच्या भावना त्या चक्रावर घाला. चक्र म्हणजे एक प्रदेश आहे व श्री गणेश तेथले राजे आहेत. तुमचे चित्त जेव्हा त्या चक्रावर घालाल तेव्हा तुमच्या भावना, प्रेमाच्या भावना, व आदराच्या भावना पण श्री गणेशांना अर्पण करा. सुरवातीस असे करा नंतर आपली करुणा व्यक्त करण्यांसाठी दुसरे कांही नाही फक्त एकच मागणे मागा - "हे निष्पापतेच्या अबोधिततेच्या देवा जगातील सर्व लोकांना निष्पापता अबोधितता द्या." पण ते मागण्यासाठी तुम्ही स्वतः निष्पाप अबोध असायला हवे. अन्यथा ते मागणे अनाधिकाराचे होईल किंवा तुम्हाला ते मागण्याचा अधिकारच असणार नाही. म्हणून निष्पापता किंवा अबोधितता समजण्यासाठी स्वतःला समजून घ्या. तुमचे मन कसे काम करते ते बघा. जेव्हा तुम्ही एखाद्याकडें बघता, तेव्हा तुम्हाला ती व्यक्ति तुमच्या ताब्यात असावी असे वाटते कां? किंवा तुम्ही तिच्याकडे जास्तच आकर्षित होता कां? किंवा तुमच्या मनात एखादा हीन विचार येतो कां? जेव्हा अबोध माणूस एखाद्या सुंदर व्यक्तिकडे किंवा सुंदर स्त्रीकडे किंवा सुंदर दृष्याकडे अथवा सुंदर निर्मितीकडे बघतो, तेव्हा सर्वात प्रथम तो निर्विचार व्हायला हवा. कोणताही विचार असू नये जर विचारच नसेल तर कोणताही हीन प्रकारचा विचार येण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तर, तुम्ही श्री. गणेशांची प्रार्थना करा, थोडेसे अनाधिकाराने असले तरी चालेल की "मला निष्पाप बनवा म्हणजे मला तुमच्याकडून वर मागण्याचा अधिकार मिळेल कि जिथे जिथे मी जाईन तेथे माझ्याकडून लोकांना निष्पापता मिळेल. माझ्यातून अबोधिता वाहू दे जेव्हा लोक माझेकडे बघतिल त्यांना मी अबोध आहे असे वाटू देत" ही करुणा झाली. ह्या करुणेतूनच तुम्ही दुसऱ्यांवर करुणा करण्यांची शक्ति मागत असता. म्हणजे जेव्हा तुम्ही बघाल तेव्हा ह्या सुंदर चक्रांमधून प्रकाश सर्वत्र पसरु लागेल तो प्रकाश ईडा व पिंगळा नाड्यामधून सिंपथीटेक मधून वाहू लागेल. मग तुम्ही स्वतःच एक शक्तिशाली अबोध व्यक्ति बनतो. तुम्ही मुखर्च किंवा बालीश बनत नाही तर एखाद्या बालकासारखे निरागस बनता. तुमचे सर्व वागणेच एक प्रकारचे भारदस्त आणि निष्पाप बनते. साधारणपणे जी भारदस्त व्यक्ति असते ती निष्पाप कधीच नसते कारण ते दिखावटी असते. दुसऱ्यावर छाप पाडण्यांसाठी आपण फार भारदस्त दिवावे म्हणून ती व्यक्ति जाणून बुजून गंभीर पणाचा आव आणते. लहान मुलाच्याकडे दिखावटीपणाचा भारदस्तपणा नसतो. कारण त्यांना मुद्यामहून काही करावयाचे माहित नसते. पण तुम्ही मात्र क्वचितच आढळणारे एक प्रकारचे निष्पापता व भारदस्तपणा ह्यांचे मिश्रणच बनून जाता.

आणखी एक गुण उदाहरणार्थ श्री. गणेशांचा होऊ लागतो. म्हणजे तुम्ही बनता. (सारासार विवेक, करणारे) पण ती एक शक्ति आहे. म्हणजे तुम्ही ही शक्ति मिळविता. हे लक्षात घ्या कि शक्ति ही भिन्न आहेत. शक्ति स्वतःच कार्यान्वित होते. उदाहरणार्थ तुम्ही स्वतः काहीच बोलणार नाही पण जर कुठे तुम्ही उभे असाल तर ज्या परिस्थितीत तुमचे स्वतःच कार्यान्वित होईल. जसे सहजयोगी गाडीने चालला आहे आणि काही अपघात झाला, बहुतेक कधी होणार नाही, पण झालाच तर कुणीही मरणार नाही तर तुम्ही असे प्रस्थापित करता कि जे स्वतःच कार्यान्वित होणारी शक्ति असते आता तू काम कर असे तुम्हाला त्यास सांगावे लागत नाही ते स्वतःच काम करते. पण तुम्ही स्वतःच त्याचे एक निर्मल व सुंदर वाहन बनता. तर तेव्हा तुम्ही हे लक्षात घ्या कि सहजयोगाच्या पहिल्या पर्वात, मला व्यक्तिगत रुपात पहाणे तुम्हाला आवश्यक होते. संस्कृतमध्ये ज्याला ध्येय म्हणतात, म्हणजे जे मिळवायचे असते, असे काहीतरी समोर असणे आवश्यक असते. तुम्हाला ते कायमच हवे असायचे व ते समोर व्यक्तिगत रुपात उभे असल्यावर, सुखी, आनंदी, सुरक्षित वाटायचे.

आता दुसऱ्या युगामध्ये, आईने तुमच्याजवळ सारखे असावे असे तुम्हाला फार वाटणार नाही.तुम्ही माझेच कार्य पुढे चालवाल.मी तुम्हाला परमेश्वराच्या इच्छेबद्दल सांगते आहे व तुम्हाला आजपासून ज्या इच्छेनुसार काम करायचे आहे.मी तुमच्या बरोबरच असते हे तुम्ही जाणता.पण मी याच शरीरात असेल असे आवश्यक नाही कारण मी ह्या शरीरात असेल की नाही ते मला माहीत नाही.पण जेव्हा ही ईश्वरी इच्छा कार्य करु लागेल तेव्हा, महान चमत्कार घडून आलेले तुम्हाला दिसतील.जेव्हा स्त्रीला मुल होते तेव्हा तिला आपोआपच दूध येते.तरी प्रत्येकाशी निसर्ग इतका जोडलेला आहे.तुमच्या दैवी इच्छेशी सुद्धा तो जोडलेला आहे आणि जेव्हा एक दैवी व्यक्ति बनता तेव्हा ती अगदी स्पष्ट कळून येते.तर तुम्ही मला कोठेही पहा तुम्ही रस्त्यावर चालत असात व एकदम श्री.माताजी तुम्हाला तुमच्या बरोबर चालताना दिसतील अशा तऱ्हेनी दुसऱ्या पर्वाची सुरवात झाली आहे.तुम्ही जर मला तुमच्या जवळ बसून तुमच्या डोक्यावर हात ठेवल्याचे बघाल तर घाबरुन जावू नका.कदाचित येशूच्या रुपात किंवा श्री.रामाच्या रुपात तुमच्या खोलीत प्रवेश करीत असलेली तुम्हाला दिसेल हे घडणार आहे व तुम्ही त्यास तयार रहा.किती तरी चमत्कार आधीच घडलेले आहेत.पण ते स्थूल स्वरुपातील होते. फोटो मध्ये तुम्ही माझ्या डोक्यातून प्रकाश येत असलेला पाहिला आहे.याशिवाय पण काही चमत्कार तुम्ही पाहिलेले आहेत. परंतु आता जे तुम्ही बघाल, त्याची कल्पनाच केली नसेल.परंतु ते घटीत होणार आहे.त्याचे कारण तुम्हाला हे कळले पाहिजे किं ह्या पज्ञा लोकाच्या नवीन प्रांतात तुमच्या उत्क्रांन्तीची एक विवक्षीत पातळी तुम्ही गाठंली आहे.कारण ह्या नवीन स्थितीत तुम्ही अतिशय विस्तृत रितीने प्रवेश करणार आहात.ह्या प्रांतात तुम्ही स्थूल गोष्टी मागणार नाहींत त्याचप्रमाणे सूक्ष्म किंवा सूक्ष्मतर गोष्टी मागणार नाही.तुमचे मागणेच संपून जाईल. आणि ह्याच वेळी तुम्ही फार शक्तिशाली व्हाल.तुम्हाला माहिती आहे किं मी जे बोलते ते घडून येते फक्त मी तुम्हाला प्रगती करुन घेण्याची आज्ञा देऊ शकत नाही.तुमच्यामध्ये कुंडलिनीचे कार्य बरेंच झाले आहे आता करुणा पसरविण्याचे हे नविन काम तुम्हाला करावयाचे आहे.प्रकाश जसा जास्तीत जास्ती प्रखर होत जातो तसा त्याने प्रकाशित केलेली जागा मोठी मोठी होत जाते म्हणून तुम्ही करणाचे दाते व्हा. मागच्या माझ्या भाषणांत मी तुम्हाला तप करण्यांस सांगितले होते, संपूर्ण शरणागतितून तुम्ही कोणतीही यात्रा केली पाहिजे उदा.ह्या किल्यांची जे तप तुम्हाला करावयाचे आहे त्याची ही नुसती एक झलक होती कारण मी असे ऐकले आहे कि येथे येत असताना तुमच्या तुमच्यापैकी कांही लोकांना थोडा फार त्रास झाला.परंतु थोडेसे धाडस करण्यात किंवा अशा ठिकाणी जाण्यात कि जेथे भूते सुद्धा प्रवेश करण्यांस धजावत नाहीत, एक प्रकारची मजा असते. आणि जर तुम्हाला तथाकथित त्रासामधूनही जर आनंद मिळवायचा माहीत असेल तर तुम्ही योग्य मार्गाने जात असाल व आपोआपच तुम्ही बनू लागता.मग तुम्ही जाणा कि तुमची बरोबर प्रगति होत आहे. जर एखाद्याने तुमच्यावर हल्ला केला आणि तुम्ही अतिशय शांत राहिलात किंवा तुमचा राग नाहीसा झाला तर असे समजा कि तुम्ही प्रगति करत आहात.

तुमच्या व्यक्तिमत्वावर जर घाला पडत असताना तुम्हाला दिसत असेल आणि तुम्ही चिंतीत झाला नाहीत तर समजा कि तुमची प्रगति होत आहे.कितीही प्रकारची कृत्रिमता असली तरी तुमच्या मनावर जर त्याची छाप पडली नाही तर समजा की तुमची प्रगति होत आहे. दुसऱ्याची कितीही भौतिक प्रगति झाली व ती पाहून तुम्हाला काहीही दु:ख झाले नाही तर समजा की तुमची प्रगति होत आहे.सहजयोगी बनण्यासाठी कितीही मेहनत किंवा त्रास घेतला तरी तो कमीच आहे.कितीही प्रयत्न करा सहजयोगी बनणे शक्य नाही.पण तुम्हाला हे विनासायास लाभले आहे.म्हणून तुम्ही कुणीतरी विशेष आहात.जेव्हा तुम्ही विशेष आहात हे तुमच्या लक्षात येईल तेव्हा आपोआपच ह्या बाबतीत तुम्ही नम्र व्हाल.

जेव्हा हे तुमच्या मध्ये घटित होते, जेव्हा तुम्ही काहीतरी मिळविले आहे, तुम्हाला काही शक्ति आली आहे, तुम्ही अबोधिता पसरवित आहात तेव्हा तुम्ही जास्तीत जास्त नम्र करुणामय व मधूर व्यक्ति बनता मग तुम्ही ह्यावर विश्वास ठेवा कि तुम्हाला तुमच्या आईच्या हृदयात स्थान आहे. नविन सहजयोग्याची ही खूण आहे. ह्या नविन युगांत त्याला जास्त गतिमान व्हायचे आहे. ह्या युगांत तुम्ही इतकी प्रगति कराल की ध्यान न करता सुद्धा तुम्ही ध्यानांत राहाल. माझ्या समोर नसताना सुद्धा माझ्या समोरच असाल. न मागताही तुमच्या पित्याचे तुम्हाला आशिर्वाद मिळतील. तुम्हाला हे सर्व मिळायचे आहे. आजच्या ह्या महान सहस्त्रार दिनांचे दिवशी ह्या नवीन पर्वात तुमचे पुनः एकदा स्वागत.

ईश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.

## विश्व वंदिता

विश्ववंदिता निर्मला माता
सर्वपूजिता निर्मला माता
ब्रम्हस्वरुपिणी योगनिरुपिणी
शुभदाम्, वरदाम् नमो नमः ॥ धृ ॥

जगत् जननी निर्मला, मूलप्रकृती आखिलेश्वरकी
नित्या सत्या सनातना, पराशक्ति परमेश्वरकी
विश्वाधारिणी, मंगलकारिणी
शुभदाम्, वरदाम् नमो नमः ॥ १ ॥

सहजयोगिनी निर्मला, निरश्रया सर्वेश्वरी
प्रेममूर्ति भक्त वत्सला, स्नेहमयी मातेश्वरी
भक्तिप्रदायिनी, मुक्ति प्रदायिनी
शुभदाम वरदाम् नमो नमः ॥ २ ॥

प्रगट सगुणा निर्गुणा रिध्दी सिध्दी की दात्री है
सौम्या सरला महामना प्रातांजली गुणदात्री है
घटघट वासिनी आत्मविकासिनी
शुभदाम्, वरदाम् नमो नमः ॥ ३ ॥

# अहंकार

१८ ऑगस्ट १९७९ रोजी केलेल्या प.पू. माताजींच्या हिंदी भाषणाचे रूपांतर

अनेक कारणामुळे अकस्मात येणे घडले. आपल्या सहज योगामध्ये अकस्मात (अचानक) येण्यालाही एक विशेष अर्थ असतो. आपण जीवनात बऱ्याचशा गोष्टी अशा बघितल्या असतील की ज्या अचानक घडतात आणि त्याचा काहीही अर्थ आपल्याला लागत नाही. जर बुध्दिच्या स्तरावरती आपण हे जाणू पाहिले की ही घटना आपल्या जीवनात अचानक कां घडली तर त्याचे कारण आपल्या लक्षात येत नाही , मनुष्याने आतापर्यंत हीच पध्दत अवलंबिली आहे की त्यामध्ये त्याला प्रत्येक गोष्ट तर्कामध्ये आणावयाची असते. आणि केवळ तर्कानेच त्याला तिचा उलगडा करून घ्यावयाचा असतो. आणि असं तर्कानी जाणून घेणं त्याचे बाबतीत योग्यच आहे कारण जर त्याची चेतनाच जागृत झाली नाही. जर त्याची चेतना सीमीत आहे , जर प्रत्येक गोष्टीचे प्रमाण तो तर्कानेच शोधत असतो तर त्याचे बाबतीत तर्काच्या कसोटीचे बाहेर जावून कोणत्याही गोष्टीचा विचार करणे अवघडच आहे.

आपण आत्मा , परमात्मा , आदिशक्ती ह्याचे बाबत बरेच ऐकले आहे. पुस्तकामध्येही वाचले आहे. माणूस सतत आत्मा , परमात्मा बाबत बोलत असतो. अनेक वेळा ह्या जगात अवतार झाले आहेत. त्यांनी हेच सांगितले की आपल्या आत्म्याला ओळखा कारण आत्मा मिळाल्याशिवाय मनुष्य , परमात्मा मिळवू शकत नाही जसं डोळे असल्याशिवाय आपल्याला रंग ओळखता येत नाहीत तसं आत्म्याला मिळविल्या शिवाय आपण तर्काने परमात्मा मिळवूं शकत नाही. बुध्दिने आपण परमात्म्याला समजू शकत नाही. आत्म्यानेच फक्त आपण परमात्म्याला जाणून घेवूं शकतो. ह्याच्या आधी आता पर्यंत सगळ्यांनी हेच सांगितलं की धर्मामध्ये जागृत रहा , आत्म्याला शोधा. आपल्या अंतर्यामी असलेल्या आत्म्याला जाणा.

हा आत्मा काय आहे ? हा आपल्या अंतर्यामी स्थिर राहून कोणते कार्य करतो आणि त्याचा परमात्म्याशी संबंध काय आहे ? असे म्हणतात. की आत्मा हा आपल्या हृदयामध्ये असलेले परमात्म्याचे प्रतिबिंब आहे. हे प्रतिबिंब असे आहे की जसे आकाशातून सूर्याचे पाण्यात प्रतिबिंब पडल्यावरही तो त्यामध्ये येत नाही तर त्यापासून अलिप्तच रहातो , तसे हा आत्मा आपल्याला जे दृष्य आहे त्याच्या पलिकडे आहे. तो त्याच्यामध्ये सामावलेला नाही. परंतु कोणतेही प्रतिबिंब पूर्णपणे येण्यासाठी जो आरसा त्याला कारणीभूत झाला असता तो पूर्णपणे स्वच्छ झाला पाहिजे. जर तो आरसा स्वच्छ नसेल किंवा त्या आरशाचे जागी जर दगड असेल तर त्या दगडामध्ये सूर्याचे प्रतिबिंब काही येणार नाही. तसेच जो मानव एखाद्या आरशासारखा झाला नाही की जो स्वतःच्या हृदयामध्ये प्रतिबिंबीत झालेले परमात्म्याचे प्रतिबिंब बघूं शकत नाही तर तो विचलीत किंवा विक्षिप्त दिसेलच. जसे वाहत्या पाण्यामध्ये दिसत असलेला सूर्य निरनिराळे आकार दाखवितो — खरं म्हणजे सूर्य आपल्या जागी स्थिर आहे आणि बदलते ते त्याचे प्रतिबिंब – तसे जो मनुष्य पाप किंवा

दुष्ट पणाने भरलेला आहे किंवा ज्याचे हृदय अनेक आकांक्षा आणि खोट्या इच्छेने भरले असेल त्याच्यामध्ये असून नसल्यासारखेच वाटते. फार फार तर थोडीशी त्याची चमक दृष्टीस पडते आणि पुन्हा लुप्त होते. तर ह्याचा अर्थ एकच की जे शरीर, मन, बुध्दि, अहंकार आपल्याला माहिती आहेत, त्या सर्वांचे एखाद्या आरश्यामध्ये परिवर्तन झाले पाहिजे. हे कसे घडून यायचे ह्याची व्यवस्थाही परमात्म्याने आपल्यामध्ये केलेली आहे.

आमच्यामध्ये अमीबा पासून मनुष्य योनीपर्यंत आणण्यासाठी अनेक अवतारांनी महान कार्य केले आहे आणि आम्हाला आजच्या ह्या स्थितीमध्ये आणून सोडले आहे. त्यामुळे आम्ही एका जागृक मानवाच्या रूपामध्ये विचरण करीत आहोत. आम्ही जागृक आहोत पण तेजस्वी नाही आंधळा मनुष्य जास्त जागृक असतो. ज्याला डोळे असतात तो बिलकुल विचलीत न होता प्रत्येक गोष्ट बघत असतो. आंधळ्याला बारीक गोष्टींची सुद्धा जाणीव असते त्याला प्रत्येक जागेची बारीक सारीक सुद्धा माहिती असते, परंतु दृष्टी असणारा माणूस मात्र ज्याच्या बद्दल माहिती पाहिजे तेवढेच बघतो. आमच्या मध्ये कुंडलिनी शक्ति जी परमात्म्याने स्थापित केली आहे तिची निर्मिती त्यांच्या इच्छेमुळेच झालेली आहे. ही कुंडलिनी शक्ती आमचा दर्पण निर्माण करते, वाढविते व स्वच्छ पण करते. हळू हळू ती त्याला असे स्वरुप देते की त्यात पूर्णपणे आत्म्याचे प्रतिबिंब सामावले जाईल. सहजयोगात कुंडलिनी जागृति फारच सोपी आहे हे आपण जाणताच आणि ती तशी जागृत होतेही, परंतू सहजयोग्यानी हे लक्षात घेतले पाहिजे की सहजयोगामध्ये सर्व प्रथम आपण आपले आरसे स्वच्छ करण्याकरिता आलो आहोत. आपल्या पापांचे क्षालन करण्यासाठी आलो आहोत. जी काही आपली पूर्व जन्माची पापे होती ती धुण्यासाठी आलो आहोत. अनादी कालापासून जे काही आमच्या मध्ये वास्तव्य करीत आहे. किंवा ज्या काही घाणेरड्या गोष्टी आमच्यामध्ये एकत्र झाल्या आहेत त्यांना निर्मळ करण्यासाठी आपण आलो आहोत. पाप एकत्र करण्यासाठी नाही. घाण एकत्र करण्यासाठी नाही. स्वतःला स्वच्छ करण्यासाठी आलो आहोत.

कुंडलिनी हा एक प्रवाह आहे की जो आपल्या चक्रामधून जाऊन आपल्या चक्रांना जागृत करतो. बऱ्याच सहजयोग्यांना हे माहिती आहे. आपल्याला हेही माहिती आहे की जेव्हां चक्रांमध्ये प्रकाश फाकतो तेव्हां आपल्या हाताच्या बोटांवर आपल्याला चक्राची जाणीव होते हेच ज्ञान आहे. हीच जाणीव आहे. आतापर्यंत तुम्हाला जे ज्ञान होते ते सतेज नव्हते त्याच्या मध्ये कोणताही प्रकाश नव्हता. आता प्रकाश आल्यामुळे तुम्हाला त्याची जाणीव होत आहे. तुम्हाला आता समजते की तुमच्या कुठल्या चक्रामध्ये दोष आहे. ती चक्रे साफ करण्याची सुद्धा पूर्ण व्यवस्था आहे आणि ती कशी साफ करतात हे ही सहजयोगात शिकविले जाते. जोपर्यंत प्रकाश नसतो तोपर्यंत आपल्याला घाण दिसत नाही. अंधारात तर दिसणारच नाही पण जेव्हां प्रकाश पडेल तेव्हा ती आपल्याला दिसेल. तेव्हा पहिली गोष्ट प्रकाश मिळविणे की ज्याला लोक म्हणतात की सत्य मिळविणे, सत्याची जाणीव होते तेव्हा पहिल्यांदा आपल्याला सत्य जाणून घेतले पाहिजे आणि त्याबरोबरच पहिली गोष्ट आपल्या लक्षात येते ती ही की आपल्या स्वतःचे गुण काय आहेत. सहजयोगामध्ये मनुष्य आपले दोष लवकरच स्विकारतो कारण तो प्रकाशामध्ये बघत असतो. समजा ह्या साडीवर एक डाग पडला आहे आणि अंधार आहे अशात जर कुणी सांगितले की तुमच्या साडीला डाग पडला आहे तर आम्ही ऐकणार नाही. कदाचित त्याचा राग सुद्धा येईल परंतू उजेडात जेंव्हा आम्ही बघु तेव्हा कळेल की एवढा मोठा डाग पडला आहे आणि आपण बघितलाच नाही, तेव्हा मग राग येत नाही. उलट कसातरी तो निघुन जावा असेच वाटते.

समजा कुठल्यातरी चक्रावर पकड आहे, समजा आज्ञा चक्र पकडले आहे. तुमच्या स्वतःच्याच ते लक्षात येईल, तुम्हाला त्रास वाटेल आणि त्या उजेडात तुम्हाला कळेल की

मला ह्या चक्रावर त्रास आहे आणि तुम्ही ते चक्र साफ कराल. पण तुम्हाला जर संवेदनाच झाली नाही तुम्हाला काही कळलेच नाही तर वेड लागले तरी सुद्धा तुमच्या लक्षात येणार नाही की तुमचे अमूक चक्र पकडले होते , अशी घाण तुमच्या मध्ये भरली होती. तसेच एखादा रोग जरी झाला तरीसुद्धा तुम्हाला हे कळणार नाही. कारण तुम्ही अंधारातच बसला आहात त्या अंधारात तुम्हाला समजावयाचेच नाही की तुम्ही सापावर बसलात कीं एखादा बॉम्ब गोळा तुमच्यावर पडतोय जेव्हां अंतरगत प्रकाशीत होते तेव्हा तुम्ही कोणत्या आपत्तित आहात हे लक्षात येते. तेव्हांच ज्ञानाचे जे पहिले दर्शन होते. स्वतःचे दोषच स्वतःच्या लक्षात येतात.

सहजयोगामध्ये लोक पार होतात आणि त्यावरोबरच स्वतःचे दोष त्यांच्या दृष्टीस पडतात. पण माणसाचा स्वभावच असा आहे की स्वतःचे दोष समजल्या बरोबरच तो सहजयोगापासून पळू लागतो. पहिल्यांदा जेव्हा तो आपले दोष बघतो तेव्हा तो घाबरतो. त्याला हेच पटत नाही की त्याच्यात एवढे दोष आहेत तो घाबरतो आणि मग शंका घेऊं लागतो. त्याच्या मनांत अनेक शंका येऊ लागतात तुम्ही बघताच की हजारो लोक येतात पार होतात पण परत येत नाहीत त्याचे कारण काय? फक्त १० टक्के लोक परत येतात. नेहमीच असे होतं म्हणुनच सहजयोग हळू हळू वाढतोय. काही हरकत नाही. परंतू त्याचे कारण असे की मनुष्याचे स्वतःशी इतके तादात्म्य आहे की त्याला स्वतःचे दोष समजून घ्यायचेच नसतात. जसे त्याला दोष दिसतात तसे तो पळून जातो. परंतू स्वतःच्या दोषांचे ओझे जन्मोजन्मी वाहण्यापेक्षा ते समजून घेऊन काढून टाकणे हे केव्हांही उत्तम. लोकांना माहिती नाही की आता कुठला समय आला आहे ही शेवटची संधी आहे ह्यानंतर पुन्हा संधी मिळणार नाही ज्याला बाईबल मध्ये लास्ट जजमेंट अंतिम परीक्षा असे म्हटले आहे तो हा काल आहे सहजयेगामध्ये तुमचे जजमेंट , परीक्षा होणार आहे. आणि ते कसे होईल , हेही तुम्ही स्वतःच जज परीक्षा करूं शकता. जेव्हां तुमच्या अंतर्यामी उजेड पडतो. तेव्हां तुम्ही स्वतःच स्वतःला जज करुं लागता बघु लागता आणि सांगता श्री माताजी माझे हे पकडलय माझे ते पकडलंय. तुम्हाला माहिती आहे की आम्ही तुमच्यासाठी सर्व तऱ्हेचे परिश्रम घेऊं शकतो. तुम्ही आपापसात सुद्धा काम करू शकता आणि त्यामुळे स्वतः मधले दोष आपली पापे तुमच्यामध्ये जे काही खराब आहे ते एकदम पूर्णपणे स्वच्छ करुं शकता कशाकरिता त्याचे गाठोडे घेऊन हिंडायचे ते गाठोडे फेकुन देण्याऐवजी तुम्ही सहजयोगापासूनच पळत आहात. माणसाच्या बुद्धीचीही काय तऱ्हा आहे. सारखीच ती विचार करत असते. आणि त्रासात असते. ह्यात घाबरण्यासारखे काही नाही थोडेसे जरी तुम्ही स्वतःला स्थिर केले तर तुमच्या हे लक्षात येईल की तुमचे अंतरंग पूर्णपणे प्रकाशित करणारी आणि स्वच्छ करणारी ही शक्ति किती प्रभावी आहे.

तर पहिल्या प्रथम आपण हे लक्षात घेतलं पाहिजे की कुंडलिनी शक्ती अतिशय पवित्र आहे. कन्या आहे आणि ही कन्या स्वरूपिणी शक्ति आपल्याला निर्मळ करते स्वच्छ करते. सहजयोगामध्ये आनंदाच्या भरात ही शक्ति आपणाला पार करते. त्याच्यानंतर फक्त दोनच गोष्टी घडूं शकतात एक तर ह्या आत्मानुभूतिला आपल्या अंतर्यामी तुम्ही समजून घ्या. आणि त्याची महानता आत्मसात करा. आणि त्याच्या गहराईत ( खोलात ) जा. नाहीतर हे पूर्णपणे सोडुन द्या. तिसरी गोष्टच होऊ शकत नाही जसे एका साहेबांनी विचारले की लंडनमध्ये किती वळणे आहेत तर दोन एक डावे आणि एक उजवं एकतर तुम्ही ह्याला पुर्णपणे आत्मसात करा नाहीतर पूर्णपणे सोडुन द्या. जर तुम्ही हे सर्व पूर्णपणे आत्मसात करायचे आणि स्वतःला पूर्णपणे स्वच्छ करायचे निश्चयच केला तर आत्म्याचे प्रतिबिंब तुमच्या अंतर्यामी दिसून येईल. ह्या कुंडलिनीयोगात तुम्ही सामुहिक चेतनेमध्ये सुद्धा जागृत होता. स्वतः बरोबर दुसऱ्याला पण स्वच्छ करता. दुसऱ्याची पापे पण धुतली जातात. हे आपल्यामध्ये फारच शुभ मानले जाते. काही माणसे

फारच शुभ असतात आणि काही फारच अशुभ असतात. ज्या घरात ते पाय ठेवतात तेथे जणूं संकटच येते ज्या देशांत ते जातात तेथे पुर येतात , जेथे त्यांचे वास्तव्य असते तेथे संकटे येतात.एक गृहस्थ मला भेटायला आले. तेविस , चोवीस वर्षाचे नवयुवक होते. मला म्हणाले की श्री माताजी मी फार अपशकुनी आहे.हे विचारले की तुम्हाला कसे माहित की तुम्ही अपशकुनी आहात तेव्हां म्हणाले की मी फारच अपशकुनी आहे , माझ्यापासून मुले सुद्धा लांब पळतात. ज्या घरात मी जातो तेथे अशी काही आपत्ती येते की आणि हे एकदां नाही अनेक वेळा झालंय , लोक आता म्हणुं लागलेत की हा माणुस अपशकुनी आहे. अशी लोक अपशकुनी असतात.त्याचे कारण जे काही पाप किंवा जो काही अंधकार आहे तो त्यांचे मध्ये भरलेला असतो आणि तो अंध:कार इतका गडद असतो की तो माणूस एखाद्या आंधळ्यासारखा जास्तच दु:खी होतो , खाली जातो. आजारी पडतो आणि अविशय क्लेश आणि दु:खामुळे संपून जातो अशातऱ्हेचे लोक कुणाच्या घरी गेले तर अकस्मात एखाद्याचा मृत्यू सुद्धा होऊं शकतो.

शकुन आपशकूनाचा विचार आपल्या देशामध्ये अनंत काळापासुन आहे. साधू संत असतात , त्यांचे स्वत:चे काही स्थान नसते , कदाचित ते चांगले कपडे ही घालत नसतील किंवा त्यांचा खाण्यापिण्याचा काही ठिकाणाही नसेल किंवा ते जंगलात राहात असतील परंतु जेव्हां ते तुमच्या घरी येतील तेव्हां सगळीकडे सुखशांती होते. परमात्म्याच्या बाबतीतही असेच म्हणा. परमात्म्याला जर ओळखावयाचे असेल तर त्यांची सर्वात माठी ओळख ही की सर्वात मोठे शुभ त्यांच्याच हातात आहे ते सर्वांचे शुभ करतात. ते सर्वांचे भले करतात. त्यांचे चरण लागताच चांगले घडून येते. ईश्वराचे जी अंगे मानली गेली आहेत , त्यांची जी सहा दाने आहेत ती सर्व शुभ व मंगलकारी आहेत.

जेव्हां जेव्हां आपल्याकडे अवतार झाले तेव्हां तेव्हां काही तरी महान मंगल कार्य झाले आहे. परंतू आता तो काळ आला आहे की ज्यांच्यात सर्वात मोठे मंगल कार्य होणार आहे. त्यांच्यामध्ये तुम्ही सुध्दा मंगलकारी आणि कल्याणकारी होऊन जाल.आपल्यामध्ये स्थित असलेल्या आत्म्याला जाणाल. सर्व अवतारामध्ये सर्वात महत्वाचे सहजयोगाचे कार्य आज आहे.त्याच्या मध्ये तुम्हालाही प्रेरणा मिळेल साऱ्या समाजाला प्रेरणा मिळेल तुम्ही सुद्धा शुभ करणारे होऊन जाल. ह्या महान अनंतकाळामध्ये कलीयुगाची छाया जगावर पूर्णपणे पसरली आहे अशा वेळी तुमच्या मशाली प्रज्वलीत होऊं देत आणि त्यांच्या प्रकाशामध्ये शुभ होऊं दे. कल्याण आणि आनंद होऊ दे. म्हणून तुमचे स्वत:चे दीप स्वच्छ ठेवण्याची जरुरी आहे. आपल्या पापांचे क्षालन करायला पाहिजे आपल्या गतकर्माची स्वच्छता झाली पाहिजे. आपल्या गतकर्माची स्वच्छता अहंकारामुळे होते.

आपला अहंकार कर्म करतो.सहजयोगामध्ये आल्यानंतर तुम्ही बघितले असेल की आपण आपला अहंकार चांगला बघू शकतो तो कसे काम करतो ते ही कळते.सहजयोगामध्ये सुद्धा अनेक प्रकारची प्रलोभने आणि त्यात जेव्हां अहंकार प्रबळ होतो तेव्हा अपल्याला हे समजत नाही की आपल्याला सहजयोगाकडे जायचय की सहजयोगाने आपल्याकडे यायचय वरंचसे लोक जेव्हां अहंकाराला आपल्या डोक्यावर चढवून ठेवतात तेव्हां ते सहजयोगाकडे पाठ करून चालू लागतात आणि समजतात की सहजयोगानी त्यांच्या मागोमाग गेलं पाहिजे.आपल्यावर अहंकाराचे आवरण असे पर्यत आत्म्याचे दर्शन कधी होणार नाही. आता ह्या अहंकाराशी लढाई करुन काही फायदा नाही सहजयोगात अहंकाराशी लढायचं नसतं मात्र हे समजून घ्यायच असतं. की आपले जे चित्त आहे ते स्वत:च जागृक होते. आपल्या अहंकाराकडे बघताच अहंकार थंड होतो कारण आपलं बघणं हेच प्रकाशमय आहे. आणि त्या प्रकाशामध्येच आपल्या अहंकाराचे खेळ आपण बघत असतो आणि हसत असतो की वा आता हेही विचार आपल्या डोक्यात यायला लागलेत. जसं तुम्ही स्वत:कडे बघूं लागता

तसा तुमचा अहंकार कमी होऊ लागतो आणि जसा अहंकार कमी होऊ लागतो तसं आपल्यामधला प्रकाश वाढू लागतो.

सहजयोग अत्यंत सूक्ष्म क्रिया आहे फारच थोड्या लोकांना हे माहित आहे की ही अति सूक्ष्म क्रिया आहे सुषुम्ना नाडी ही अगदी बारीक अगदी सांकळी अगदी छोटी आहे. ब्रम्हनाडीच्या अगदी मधोमध.त्याचे कारण मनुष्याची त्याच्या कर्मांशी असलेली आसक्ति ब्रम्हनाडी जी अतिशय सूक्ष्म आहे ती आपल्या पापांनी आपल्या घृणीत गोष्टींच्या वजनाने इतकी लादली गेलेली आहे इतकी संकुचित झाली आहे की कुंडलिनीचा एक अगदी छोटासा धागाच त्यातुन जाऊ शकतो.

हे लक्षात घ्या की कुंडलिनी हा बऱ्याचशा सूत्रांनी बनलेला एक प्रज्वलित मार्ग आहे. त्याच्यातील एक छोटासा धागा किंवा सूत्र फक्त ब्रम्हनाडीतून निघू शकते. अशी परिस्थिती आहे ही अतिशय सूक्ष्म आणि गहन क्रिया आहे आणि हे तुम्ही सर्वांनी बघितले आहे.जेव्हां कुंडलिनी जागृत होते तेव्हा ती कशी वर खाली जाते तीचे स्पंदन हे तुमच्या पैकी बऱ्याच लोकांनी बघितले आहे. मोठ्या मुष्किलिने खालच्या बाजूने मार्ग काढून ब्रम्ह नाडीच्या अतिशय अरुंद अशा मार्गातून एखादे सूत्र तरी वर चढावे असा कुंडलिनीचा प्रयत्न असतो. आणि अशा तऱ्हेने अतिशय सूक्ष्म धाग्याने कां होईना पण ती तुमचे ब्रम्हरंध्र छेदतेच. सुरवातीला बऱ्याच लोकांमध्ये ही घटना सहज घडून येते. परंतू तिच्या वरच्या वजनामुळे त्या दबावामुळे बऱ्याच लोकांमध्ये कुंडलिनी परत खाली बसते.नंतर ते विसरुन पण जातात की कधीतरी त्यांची कुंडलिनी जागृत झाली होती.आणि त्यांच्या हे लक्षात ही येत नाही की ह्या ज्या थंड लहरीचा त्यांनी अनुभव घेतला जी मनःशांती त्यांना मिळाली होती ती समाप्त झालीय. जो थोडासा प्रकाश त्यांच्यामध्ये पडला होता त्याच्यामुळे त्यांना वाटू लागते की "अरे हे सगळे आपल्यामध्ये आहे काय" मग ते घाबरतात आणि संशयात पडतात.

मनुष्याची बुद्धि अनेक तऱ्हेच्या शंका काढते.सर्व प्रथम बहुतेक सर्वांना ही शंका येते. की माताजी कोण आहेत हा पहिला प्रश्न.तर मला हे तुम्हाला सांगायचं की जो पर्यंत तुमचे आत्म चक्षु उघडणार नाहीत तो पर्यंत तुम्ही मला समजू शकणार नाही. आणि तसा प्रयत्नही करुं नये. पहिल्यांदा तुमच्या आत्म्याचे डोळे उघडा.

जेव्हा श्री राम आले होते तेव्हा लोक म्हणाले की आम्ही परशुरामांना मानतो. जेव्हां श्रीकृष्ण आले तेव्हा म्हणाले की श्री रामाला मानतो जेव्हां श्री नानक आले तेव्हा श्रीकृष्णाला मानले आणि येशु आले तेव्हा इब्राहिमला मानले हे सर्व मनुष्य देहधारीच होते. परंतु मानवी बुद्धिची ही चाल कशी विचित्र आहे बघा आता आम्ही आलोत तर लोक श्री साईनाथाना मानतात.पण जेव्हां ते होते तेव्हा त्यांना खायला सुद्धा मिळाले नाही ते सुद्धा मनुष्य होते पण जेव्हां ते मनुष्य स्वरुपात राहिले नाहीत तेव्हा ते पूज्य झाले.जोपर्यंत जीवीत होते तोपर्यंत काही कामाचे नव्हते, परंतू मेल्यावर मात्र भगवान झाले ह्याचे कारण काय असावे? माणूस असे कां वागतो.असे त्याने कां केले आतापर्यंत?

गंगा जिथे वहात आहे तिथेच तर तिचे पाणी मिळणार. आज जर येथून गंगा वहात आहे तर तुम्ही का नाही मानत की ती गंगा आहे? जिथे आधी वहात होती तिथे आता नाला आहे.किंवा काही सुद्धा नसेल त्यालाच जर तुम्ही गंगा मानणार असाल तर मग तुम्ही हवे ते करा.आज जर इथून गंगा वाहतेय तर तुम्ही तिला कां नाही मानत?

मानवी बुद्धि समजून घेणं हे काही सोपं काम नव्हे. मनुष्याची बुद्धि समजून घेणं ही जगातील सर्वात कठीण गोष्ट आहे. ईश्वराला समजणं फारच सोपं आहे कारण ते जसे आहेत तसेच आहेत.माणसासारखे दुटप्पी नाहीत. दुटप्पी पणाच काय कितीतरी अजब गोष्टी मनुष्यामध्ये आहेत. विंचू, साप, हत्ती, घोडे, वाघ वगैरे सर्व प्रकारच्या जनावरांचे माणसामध्ये वास्तव्य असते. माणसाच्या बुद्धिची चाल कशी अशी कां असते तुम्हाला कधी कळणार नाही.

जर येथून गंगा वहात आहे तर ती मधून तुम्ही पाणी कां नाही घेत? एक प्रॅक्टीकल उदाहरण हा प्लग चालू आहे तर तुम्ही जो खराब प्लग आहे तेथे जोडणार कां? मला हे लक्षातच येत नाही की माणसाच्या बुद्धिवर अशी कोणती जादू झाली आहे की जे सत्य उघड दिसत आहे याचा तो स्विकार करत नाही आणि जे दृष्टीस पडत नाही ते मात्र मानतो. त्याचे कारण बऱ्याच कालापूर्वी लक्षात आलं होत ते म्हणजे अहंकार मनुष्याला फारच जास्ती अहंकार आहे. श्री रामाच्यावेळी जर त्यांना मानले असते तर सांगितले असते की आपली कुंडलिनी जागृत करुन घ्या पार व्हा आणि सहजयोगामध्ये स्थिर व्हा. श्रीकृष्णाच्या वेळी जर त्यांना मानले असते गोकुळामध्ये खेळ खेळण्याऐवजी तुम्हाला बसवून सहजयोग शिकविला असता. नानकांच्या वेळी जर सहजयोग मानला असता तर तुमच्या साठी येवढे डोके फोड करून असे करा तसे करा वगैरे सांगायची त्यांना काहीही जरुर पडली नसती त्यांनी सरळ सरळ तुम्हाला सहजयोग शिकविला असतां परंतू त्यावेळी त्यांना ओळखणारे लोक फार थोडे होते.

जेव्हां ते नाही आहेत तेव्हां गुरूद्वारे बांधले महम्मदसाहेब नाही आहेत तर मशिदी बांधल्या कारण आता लोकांना वाटले की महम्मदसाहेब आता आपल्या हातात आले. तसेच लोकांना वाटू लागले राम आपल्या हातात आले त्यांचे मंदीर बांधून टाका आणि म्हणा हे आमचं मंदीर आहे हा आमचा राम आहे ह्याचेवर आमचा अधिकार आहे तुम्ही मंदीरात या आणि जे काही आणलय रुपये आणि जे काही - इथे वाहा कारण आम्ही ह्या मूर्तीचे स्वामी आहोत. केवळ अहंकारा मुळेच मनुष्याला असे वाटते की तो ईश्वराला आपल्या ताब्यात ठेवूं शकतो म्हणून त्याने हे सर्व देखावे उभे केले. प्रत्येक वेळी असेच देखावे बनविले गेले. आम्ही बघतो. की मोठी मोठी मंदीरे बांधली आहेत पण तिथे काय चालते जिथे स्वयंभू भगवान आहेत तिथे तरी काय चालते?

अहंकार माणसाला गाढव बनवितो. गाढवाला सुद्धा काही मान असतो काही अक्कल असते पण माणसाला जर अहंकार झाला तर त्याच्या सारखे गाढव सुद्धा असूं शकत नाही. मनुष्य आणि अहंकार ह्याचे जर समीकरण बसविले तर ते गाढवच. मनुष्यामध्ये अहंकाराचे फुगे फुगतात ते कसे फुगतात हे जर सांगितले तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. एखाद्याला जास्त पैसा मिळाला तर तो गेला कामातून लाखातील फक्त एक पैसेवाला माणूस शहाणा असेल. जर एखाद्याला पैसा मिळाला की लगेच तो विचार सुरुं करेल की कुठे जावून दारु पिऊ की कुठल्या घाणेरड्या बाईला जावून पैसे देवूं की कुठल्या घोड्यावर जावून पैसे लावूं. माणसाच्या मनात कधी असे येत नाही की आज पैसा मिळालाय तर त्याचा काही चांगला उपयोग सुद्धा होऊ शकेल की ज्याच्यामुळे ईश्वराचा आशिर्वाद मिळेल. त्याच्यातही आपला अहंकार दाखवितील. समजा रामाचे मंदीर बांधले तर म्हणतील की हे अमक्या तमक्याचे मंदीर आहे. किंवा आमच्या वडिलाचे नांव ह्या मंदीराला द्या ह्या मूर्खपणाला काय म्हणावे. तुमच्या वडिलांनी जर काही चांगले काम केले असते तर आपोआपच ते प्रसिद्ध झाले असते. अशा तऱ्हेच्या खोट्या अहंकाराची रचना करुन मनुष्य सत्या पासून दुर जातो आणि हाच अहंकार माणसाला साक्षात सत्य जरी समोर उभे असले तरी त्याला मानू नकोस असे शिकवितो. कारण सत्याचा स्विकार केल्यास तुम्ही अहंकारापासून दूर जाल. परंतू त्याच्यावर उपायही बरेच असतात. समजा एक मनुष्य खूप पैसेवाला आहे किंवा फार सत्ताधिश आहे. जास्त सत्ता असणे पण एक गाढवपणाच आहे अगदी विदूषकासारखा होऊन जातो माणूस जास्त सत्ता असल्यावर एक विदूषक होऊन जातो. एखादी स्त्री जर फार सूंदर असेल आणि तिच्या डोक्यात जर भरलं की आपण फार सुंदर आहेत तर ती पापाच्या गर्तेत सुद्धा जाऊ शकेल एखादी गोष्ट अतिशय मिळाल्यानंतर मनुष्य गाढवा सारखा होतो. त्याचे कारण तो ती सांभाळू शकत नाही. एखाद्या बादशहाच्या समोर लाखो कोट्यावधी रुपये जरी पडले तरी त्याला त्याचे काही विशेष

वाटत नाही.पण एखाद्या दारिद्रयाला जर धन मिळले तर त्याला हे समजत नाही की तोंडाने खाऊ की , नाकाने का कानाने. एखादा खरोखरचा राजा जर राज्यपदावर आला तर त्याला त्याचे काही विशेष वाटत नाही तो एखाद्या राजासारखाच जगात रहातो. साध्या सुध्या गोष्टीमध्ये तो लक्ष घालत नाही. परंतू साधा मनुष्य हे सांभाळू शकत नाही. कारण ते सांभाळण्याची शक्तीच त्यांच्यात नसते कारण तो स्वतः एखाद्या टोकावर नसतो. जेव्हा तो स्वतःमधील "अति" ला मिळवितो. तेव्हा बाकी सर्व गोष्टी त्याला तूच्छ होऊन जातात उलट अहंकारामुळे माणूस आपले स्वातंत्र्य गमावून बसतो आणि दिवस रात्र एका जाळ्यात अडकून बसतो व त्याला वाटते की "वा वा मी कीती मोठा माणूस मला सगळे हार घालतात. " त्याला हे समजतच नाही की त्याचा खरा रस्ता कुठला आणि तो कुठे चालला आहे. इतका मूर्ख आहे माणूस.

आता तर असा काळ आला आहे की तुम्ही जरा धावून मागे वळून बघायला पाहिजे. आता जागे होण्याची वेळ आली आहे. बघण्याची वेळ आली आहे , समजावून घेण्याची वेळ आली आहे. आपल्या अहंकाराच्या ज्या पायरीवर पोहोचला असाल तेथेच थांबा आणि वळून बघा , तुम्हाला समजेल तुम्ही अजून काहीच मिळवले नाही. तुम्हाला अजून काहीच समजले नाही , नम्रपणे ह्या परिस्थितीचा स्विकार करा आणि आपल्यामध्ये हे बिंबवून घ्या अजून आपल्या आत्म्यालाच तुम्ही जाणलेले नाही. प्रत्येक पाऊला गणिक तुम्ही नश्वर गोष्टीच्या मागे लागला आहात की तुम्हाला पारतंत्र्याच्या बेडित जखडून ठेवतात आणि तुम्हाला षडरिपुंचे गुलाम बनवितात. एक मिनिट जरा थांबून तर बघा , जिथे तुम्ही थांबाल तिथे तुम्हाला कळून येईल की अनंताशी एकरूप झालेल्या परमात्म्याचे प्रतिबिंब तुमच्यात असलेल्या दर्पणामध्ये आत्मारूपाने घडलेले आहे. त्याला जाणा , त्याच्यात उतरा त्याच्या आनंदाचा अनुभव घ्या. त्याच्या प्रकाशाने सर्व जगाचा अंधकार दुर करा. हे फार महान कार्य आहे. पण अवघड हेच आहे , की ह्या लहान कार्यात अधिक लोक टिकत नाहीत , आता मी जर तुम्हाला संमोहित केल तर हजारो लोक येऊन इथे बसतील. लंडनमध्ये असेच एक गुरूजी येऊन पोहोचले आणि त्यांनी नव्वद हजार लोकांना लुटले. प्रत्येकाकडून सहा हजार रूपये घेतले. त्यांच्या पैकी साठ लोक माझ्याकडे आले त्यांना फीट येण्याचा आजार झाला होता. मी त्यांना विचारल की तुम्हाला काय शिकवलं ? सुरवातीला कोणता मंत्र दिला ? सहा हजार डॉलर घेऊन त्या बिचाऱ्यांना जो मंत्र दिला होता त्याचे नाव आईगा , फिईगा आणि टींगा. त्याच्याकडे हा मंत्र लिहून दिला होता आणि त्याला गुप्त ठेवायला सांगितल होतं. आणि सागितलं की ह्या मंत्राचा जप करत रहा म्हणजे तुम्हाला खूप सिद्धी प्राप्त होतील. आज त्या बिचाऱ्यांची फार वाईट परिस्थिती आहे. बिचारे रस्त्यावर पडले आहेत. त्यांची घरे उजाड झाली आहेत मुलांना खायला नाही , पायात जोडे नाहीत. तेव्हाच जर त्यांच्यामध्ये सुज्ञता आणि शहाणपण असतं तर ते असल्या अहंकाराचे पोषण करणाऱ्या माणसाकडे गेलेच नसते. कारण तो सगळ्यांना सांगतो की तुम्ही फार मोठी व्यक्ति आहेत तुम्ही भोगानंद आहात , तुम्ही चांगले कपडे घालून आले पहिजे. तुम्ही कळावे ठिकाणे आहात वगैरे जसं जमेल तसा तुमचा अहंकार प्रज्वलीत करून ते आपले खिसे भरतात. असे लोक जगातल्या सर्वांना आवडतात. मोठी वर्तमानपत्रे त्यांच्या जाहिराती करतील , त्याची स्तुति करतील कारण त्यांच्याकडे पैसा आहे आणि पैशाच्या जोरावर ते सगळ मिळवतील. मोठे लोक त्यांना भेटतील पण अंतरगात बघा किती खोटेपणा भरलेला आहे. परंतू माणसे त्या खोटेपणाचीच पूजा करतात , त्याला काय म्हणावं ? परंतू ते स्वतःच एक प्रकारच्या असत्यात रहात असतात आणि ते म्हणजे त्यांचा अहंकार जो माणूस त्या अहंकाराला संभाळतो आणि मोठे करतो , त्याच्यातच रहातो. आणि त्याच्यातच त्याचा सर्वनाश होतो.

कशा करिता मी पुनः पुनः विचारते की कशा करता स्वतःचा सर्वनाश तुम्ही ओढवून घेत आहात ? तुम्ही स्वतःला समजावून घेत नाही. त्याचे कारण ? काय स्वतःला परमात्म्याच्या हवाली तुम्हाला का करावेसे वाटत नाही ? वाईट लोकांच्या मागे तुम्ही कां जाता ? त्यांच्यासाठी तुम्ही प्राण द्यायलाही तयार आहात. ते तुम्हाला लुटताहेत , फरपटताहेत , तुमचे सर्व त्यांनी वाईट करून ठेवले आहे कारण त्यांनी तुमच्यावर मोहिनी घातली आहे. तुमच्यामध्ये तुम्ही जाणून घ्यावी अशी कोणतीच शक्ति नाही कां ? परमात्म्याशी भेट ही पूर्ण स्वातंत्र्यातच होत असते. सहयोगामध्ये

ज्या काही थोड्याशा स्वातंत्र्याचा तुम्हाला सुरूवातीलाच अनुभव येतो.केवळ तेवढ्या मुळेच तुम्ही घाबरून जाता आणि तुम्हाला वाटू लागते की आधिचे पारतंत्र्यच ठीक आहे.

सहजयोग फारच सरळ अहे. परंतू तुम्ही सरळ नाहीत. शहरामध्ये बऱ्याच प्रकारे दबाव आहेत. ह्या तणावामध्ये अडकूनच बराचसा त्रास तुम्हाला सहन करावा लागतो.म्हणून सुरवातीला स्वतःला सरळ बनविले पाहिजे. तुम्हाला माहिती आहे आमचे काम खेड्यामध्ये विशेष प्रकारे आणि जोरात होते.शहरामध्ये अहंकार जास्त प्रबळ आहे.छोट्या गोष्टींचाही लोकांना अहंकार होतो. ह्या कारणामुळे जे लोक तुमचा अहंकार सांभाळतात त्यांना तुम्ही शरण जाता आणि ते मात्र तुम्हाला लुबाडून निघून जातात. आणि तुम्ही फक्त बघत राहाता आणि हजारो लोक तुमच्यामध्ये येतात. तुम्हाला आश्चर्य वाटेल कि जितके कॅन्सर आणि लुकेमिया वगैरे भयंकर रोगांनी पछाडलेले मी बघितले आहेत आणि ते सर्वच्या सर्व कोणत्या ना कोणत्या तरी खोट्या गुरूंचेकडे किंवा जादू टोणा करणाऱ्याचे किंवा एखाद्या तांत्रिकांचे शिकार झालेले आहत.

अशा प्रकारचे संबंध नसणारा एकही कॅन्सर पेशंट मी बघितला नाही म्हणूनच असे म्हणतात की डॉक्टर लोक कॅन्सर बरा करु शकत नाहीत.आता तुम्ही समजू शकाल की हे लोक किती अपशकुनी आहेत. दुष्ट आणि घातक आहेत. त्यांच्या आजूबाजूचे वायूमंडळ किती वाईट आहे जेवढ्या वाईट मंडळात जातील त्यांची किती दुर्गती होईल हे तुम्हाला समजेल तर तुम्हाला आश्चर्य वाटेल.मोरबी मध्ये बरेच लोक मृत्यू पावले पण त्यांच्यात काही निष्पाप पण होते.कारण एक फार मोठ पाप तिथे घडणार होते तुम्ही ऐकले असेल की मोरबी मध्ये एका साधूला खूप मोठी जागा घेण्याचे त्या लोकांनी ठरविले होते. माणसांनी हे लक्षांत घेतले पाहिजे कि कोणाच्या हातचे बाहुले आपण बनत आहोत. आणि कशा तऱ्हेने स्वतःचा सर्वनाश ओढवून घेत आहोत.

मी तुमची आई आहे या नात्याने तुम्हाला समजावते आहे आणि तुम्हाला सांगते की अशा तऱ्हेच्या दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांचे कडे जाऊन स्वतःचा सर्वनाश करू नका. अशा लोकांच्या कडे जाऊन तुमचा आत्मा पूर्णपणे नष्ट करू नका. आत्म्याला जाणा शंका-कुशंकांच्या अंदोलनात खराब करण्याची काहीही आवश्यकता नाही.पहिल्या प्रथम पार व्हा , पहिल्यांदा आत्मा मिळवा , पुढचे आम्ही बघून घेतो.त्याचे आधी शंका कुशंका करण्यास तुमच्याकडे दृष्टी कोठे आहे? कशाच्या आधारावर तुम्ही शंका कुशंका कराल? आणि तर्क-वितर्क कराल? तुमच्याकडे असे काय आहे की त्याचेमुळे तुम्ही खरी आणि खोटी व्यक्ती शोधून काढाल? प्रथम आत्म्याला जाणा. जोपर्यंत तुम्हाला आत्मा मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही गोष्टीची चर्चा करणे व्यर्थ आहे.ही अतिशय सूक्ष्म गोष्ट आहे. ही काही साधीसुधी गोष्ट नाही की कोणाकडे तरी जा , त्याचा चेहरा बघा , त्याने काही तरी सांगावे अणि झाले काम.अशा प्रकारच्या कोणत्याही घाणीत जाऊन अडकू नका.

सहज योग ही एक फार मोठी करामत आहे.फारच मोठी ती बघून मला स्वतःलाच आश्चर्य वाटते. कारण माणसामध्ये अशी करामत घडून येईल व ती वृद्धिंगत होणे फारच कठीण काम होते. येशू ख्रिस्त अशा प्रकारचे मोठे काम करणाऱ्यातले शेवटचे व्यक्ती समजले पाहीजेत. त्याचे नंतर आपण म्हणू शकतो , की गुरू तत्वावर नानक साहेब होते. त्यांचे काळात सुद्धा इतक्या लोकांनी आत्म्याचे ज्ञान मिळाले नव्हते.ते सुद्धा डोकेफोड करून थकले.त्यांनी मनुष्यरूप घेतले होते पण तरी सुद्धा लोकांनी त्यांना समजून घेतले नाही.मी सुद्धा त्या सर्वांचे बरोबर होते आणि मला आनंद आहे. आज सहज योगामध्ये या देशात जवळ जवळ दहा हजार लोक आहेत की ज्यांनी ते मिळविले आहे. ठीक आहे , बघू काय होते ते? आमच्या दृष्टीने आले तरी ठीक नाही. आले तरी ठीक.हे लक्षात ठेवा की परमात्मा तुमच्या पायावर झुकणार नाही. तुमचे स्वातंत्र्यातच तुम्हाला हे मिळवावयाचे आहे.

तुम्हाला नाही मिळाले तर परमात्म्याचा दोष नाही. सहजयोगाचा नाही.आमचा नाही , आत्म्याचा नाही तर तुमचा आहे. कारण तुम्ही तुमच्या अहंकाराला चिकटून बसलेले आहात.हे तुमचे धन आहे , तुमची संपदा आहे आणि तुम्हाला ती येवढ्या साठीच मिळाली आहे की तुम्ही ती पूर्णपणे मिळवावी.

परमेश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.